


# ॥ ज्योतिर्मय ॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १ ला ❑ सोमवार दि.२६ जानेवारी २०२६ ❑ पाने ६ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)

## ‘‘ज्योतिर्मय‘‘ सत्य आणि निर्भिड पत्रकारितेचे १ वर्ष पूर्ण !

ज्योतिर्मय साहित्य

पुणे : ‘‘ज्योतिर्मय‘‘ साहित्याचे विद्यापीठ या वर्तमान पत्राला आज एक वर्ष पूर्ण झाले आहे. आजच्याच दिवशी म्हणजे २६ जानेवारी २०२५ रोजी ज्योतिर्मय साहित्याचे विद्यापीठ या ऑनलाईन वृत्तपत्राची सुरुवात या वृत्तपत्राचे संपादक आदरणीय श्री संजयजी व्यापारी यांनी पुणे येथून सुरू केले.


सत्य आणि निर्भिड पत्रकारितेचे १ वर्ष आज या वर्तमानपत्राने पूर्ण केले. आज या वर्तमान पत्राची वर्षपूर्ती असून वर्षपूर्ती निमित्त शुभेच्छा!!

वर्षपूर्ती म्हणजे केवळ एका वर्षाचा कालावधी पूर्ण करणे नव्हे, तर समाजाप्रती असलेली जबाबदारी नव्याने अधोरेखित करणे होय. संजयजी व्यापारी यांनी समाजाप्रती, देशाप्रती बांधिलकी स्वीकारत असताना अत्यंत तळमळीने व नवोदित लेखकांसाठी निःशुल्क स्वरूपात हे व्यासपीठ उपलब्ध करून दिले. पत्रकारिता ही निर्भिड असायला पाहिजे. आज बहुतांश वृत्तपत्रे कुठल्या कुठल्या राजकीय पक्षाशी नेत्यांशी बांधिलकी स्वीकारलेली आहेत त्यामुळे त्यांच्या निर्भीड पत्रकारितेवर प्रश्न उपस्थित होत असतो.

वृत्तपत्रे हे लोकशाहीचा चौथा स्तंभ असून त्यांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता, निः पक्षपातीपणे आणि निर्भीडपणे सत्य समाजासमोर मांडले पाहिजे. समाजाचे सजग प्रहरी म्हणून त्यांनी अन्यायाविरुद्ध आवाज उठवून खऱ्या अर्थाने समाजाचा आरसा (दर्पण) बनणे काळाची गरज आहे. ज्योतिर्मय साहित्याचे विद्यापीठ हे निर्भीड वृत्तपत्र असून सत्य आणि पारदर्शकता, दबावमुक्त कार्य, समाजप्रबोधन, निःपक्षपातीपणा या वृत्तपत्राने जोपासले आहे.

नवोदित लेखक, कवी, अभ्यासू विश्लेषक यांना एक चालते बोलते व्यासपीठ उपलब्ध व्हावे, नवोदित लेखकांच्या अभिव्यक्तिला कुठेतरी वाव मिळावा, या उदात्त हेतूने प्रेरित होऊन संजयजी व्यापारी यांनी अगदी निर्भिडपणे ज्योतिर्मय साहित्याचे विद्यापीठ हे व्यासपीठ उपलब्ध करून दिले. आज या वृत्तपत्राने मोठा उच्चांक गाठला असून आजमितीस १५० + लेखक, कवी या वृत्तपत्राशी जोडले असून ८० हजार + या वृत्तपत्राचे वाचक आहेत. ही उपलब्धि या वृत्तपत्राची विश्वासार्हता दर्शविते.

वृत्तपत्राची वर्षपूर्ती (ॲनिवर्सरी) हा प्रकाशन संस्थेसाठी एक महत्त्वाचा टप्पा असतो, जो विश्वासार्हता, वाचकसंख्या आणि व्यावसायिक यश साजरे करतो.



वृत्तपत्र या लेखात मुख्य शब्द वृत्त असा असला तरी केवळ वृत्त देणे एवढाच वृत्तपत्राचा आवाका नाही. वृत्तपत्रे ही वाचकांच्या जीवनाशी, विचारांशी, ध्येयवादाशी त्यांच्या सामान्य गरजा, त्यांचे प्रश्न त्यांवरील अन्याय,त्यांचे अभिमान, त्यांचे आनंद आणि दुःख ही अशा वेगवेगळ्या प्रसंगाशी समरस झालेली असते. श्री संजयजी व्यापारी यांनी काढलेले ज्योतिर्मय हे मराठी पत्रकारितेची नवोदित अभिव्यक्ती समजली जाते.




वृत्तपत्रे ही अनेक पानांमध्ये प्रकाशित होत असतात. काही वृत्तपत्रे ही दररोज प्रकशित असतात, त्यांना दैनिके म्हणतात. काही वृत्तपत्रे ही आठवड्याला प्रकाशित होत असतात, त्यांना साप्ताहिक असे म्हणतात. काही वृत्तपत्रे ही पंधरा दिवसांनी प्रकाशित होत असतात त्यांना पाक्षिक असे म्हणतात. तर काही वृत्तपत्रे ही दर महिन्याला प्रकाशित होत असतात, त्यांना मासिक असे म्हणतात. काही वृत्तपत्रे दर तीन महिन्याला प्रकाशित होतात त्यांना त्रिमासिक असे म्हणतात. तर काही वृत्तपत्र ही दर सहा महिन्याला प्रकाशित होत असतात, त्याला सहामाही असे म्हणतात. तर दर वर्षी प्रकाशित होत असलेल्या वृत्तपत्राला वार्षिक असे म्हणतात. वृत्तपत्रांमधून आपल्याला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घडामोडी, राजकारण, साहित्य, कला, क्रीडा आणि सांस्कृतिक घडामोडी समजतात. वृत्तपत्रांद्वारे आपल्याला जगात कुठे काय घडले ते समजते. ज्योतिर्मय साहित्याने सर्व प्रकारच्या बातम्यांना जागा दिली आहे.

ज्योतिर्मय साहित्याचे विद्यापीठ या दैनिक वृत्तपत्राची वर्षपूर्ती साजरी करताना या दैनिकाने वाचकांना लेखकांना निशुल्क हे वृत्तपत्र उपलब्ध करून दिले हे या वृत्तपत्राचे विशेष वैशिष्ठ्य म्हणून सांगता येईल. एवढेच नव्हे तर या वर्तमानपत्रात कुठल्याच प्रकारच्या व्यावसायिक जाहिराती प्रकाशित केल्या जात नाही. खरं तर व्यावसायिक जाहिराती, शासनाच्या जाहिरातीतून वृत्तपत्रला मोठी मिळकत मिळत असते या जाहिरातीतूनच वृत्तपत्र व्यवसाय चालत असतो वृत्तपत्रांचा व्यवसाय मुख्यत्वे जाहिरातींवर चालतो, कारण वाचकांकडून मिळणाऱ्या वर्गणीपेक्षा जाहिरातींद्वारे मिळणारा महसूल हा त्यांच्या उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत असतो। या जाहिराती स्थानिक वाचकांपर्यंत पोहोचवण्याचे प्रभावी माध्यम म्हणून काम करतात, तसेच वृत्तपत्रांना आर्थिक स्थैर्य प्रदान करतात बदलत्या काळात डिजिटल जाहिरातींच्या स्पर्धेतही प्रिंट जाहिराती विश्वासार्हतेमुळे प्रभावी आहेत.मात्र संजयची व्यापारी यांनी या वर्तमानपत्रात कुठलीच व्यावसायिक जाहिरात प्रकाशित करायची नाही, असा ठाम निर्धार व्यक्त करत त्यांनी हे वृत्तपत्र सुरू केले. नवोदित लेखक, कवी, विश्लेषक यांच्या पुस्तक प्रकाशनाची बातमी अगदी निःशुल्क प्रकाशित करण्याचा निर्धार संजयजी यांनी घेतलेला आहे.या निर्धारात ते खरे उतरले आहे.

या वृत्तपत्राची मांडणी अत्यंत सुबक आकर्षक आहे.वृत्तपत्राची मांडणी वाचकांसाठी आकर्षक, सुटसुटीत आणि माहितीपूर्ण असावी, ज्यामध्ये मॉड्युलर डिझाइन (चौकोनी मांडणी), स्पष्ट शीर्षके, उच्च-गुणवत्तेची छायाचित्रे आणि वाचनीय फॉन्टचा वापर करणे आवश्यक आहे. मांडणीमध्ये ग्रिड-आधारित रचना, योग्य पांढरी जागा आणि समतोल वापरून मजकूर व चित्रांचा समतोल राखला पाहिजे, ज्यामुळे वाचकांचा ताण कमी होईल. ज्योतिर्मय साहित्याचे विद्यापीठ हया सर्व वैशिष्ट्यांत खरे ठरले आहे.

या वृत्तपत्रात स्थानिक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, व्यापार विषयक वाणिज्य विषयक, क्रीडा विषयक, अध्यात्मिक, नवोदित कवींचे व लेखकांचे विचार, लेख नियमित प्रकाशित होत असतात. काही पारंपरिक वृत्तपत्रे उदयोन्मुख, नवोदित लेखक, व कवींना वृत्तपत्रात जागा देत नाही. काही वृत्तपत्रे निवडक लेखकांनाच जागा देतात. नवोदित लेखक व कवींना जागा मिळत नसते. त्यामुळे अनेक लेखक अभिव्यक्ती पासून वंचित असतात. मात्र संजयजी व्यापारी यांनी अनेक नवीन लेखकांना आपल्या वृत्तपत्रात जागा दिली. आज अनेक नवोदित लेखक कवी आपले विचार या वर्तमानपत्रातून बिनधास्तपणे मांडत आहे. काही लेखकांनी तर आपली पुस्तके देखील प्रकाशित केलेली आहेत. ही फार मोठी उपलब्धी आहे.

**

## ‘मराठी भाषा’ ही नदीप्रमाणे सतत वाहणारी परंपरा - डॉ. किरण कुलकर्णी

ज्योतिर्मय साहित्य

मुंबई : मराठी भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसून हजारो वर्षांची नदीसारखी अविरतपणे वाहणारी सांस्कृतिक परंपरा आहे, असे प्रतिपादन मराठी भाषा आणि सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांनी केले.

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांच्या वतीने आयोजित ‘‘व्याख्यानमाला’’ या कार्यक्रमात त्यांनी मराठीच्या अभिजात दर्जाचे महत्त्व, भाषेचा ऐतिहासिक प्रवास आणि पुढील टप्प्यातील विकास आराखडा यावर सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी सांस्कृतिक कार्य विभागाच्या उपसचिव नंदा राऊत, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संचालक मीनल जोगळेकर, सल्लागार समितीचे सदस्य डॉ.शिरीष ठाकूर तसेच मराठी भाषा अभ्यासक, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



मराठीला अभिजात दर्जा मिळणे हे केवळ ‘‘शिक्कामोर्तब’’ नसून केंद्र शासनाच्या विशेष योजनेतून भाषाविकासासाठी संधी निर्माण करणारे असल्याचे सचिव डॉ.कुलकर्णी यांनी स्पष्ट केले. त्यांनी महाराष्ट्रीन प्राकृत, अपभ्रंश आणि पुढील अर्वाचीन मराठी असा भाषेचा प्रवास मांडत वररूचीच्या ‘प्राकृतप्रकाश’ ग्रंथाचा संदर्भ देऊन मराठीच्या प्राचीनत्वाचे पुरावे अधोरेखित केले. ज्ञानेश्वरी, लीळाचरित्र, संतसाहित्य आणि १९ व्या शतकातील आधुनिक मराठीच्या वाटचालीचा आढावा घेत त्यांनी मराठीतील प्रतिभा, माधुर्य आणि मौलिकता यावर प्रकाश टाकला. मात्र ज्ञानेश्वरपूर्व दीड हजार वर्षांच्या भाषिक-लिखित परंपरेवर अपेक्षित संशोधन कमी झाल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली.


अभिजात भाषा योजनेअंतर्गत राज्याला ‘सेंटर ऑफ एक्सलन्स’ स्थापन करण्याची संधी मिळणार असून त्याची अधिसूचना फेब्रुवारी-मार्चपर्यंत अपेक्षित असल्याचे डॉ.कुलकर्णी यांनी सांगितले. यासाठी विभागाकडून डीपीआर () तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात असून तज्ज्ञांच्या सल्ल्याने विविध प्रस्ताव त्यात समाविष्ट केले जात असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच अमरावती येथे झालेल्या ११ अभिजात भाषांच्या परिषदेचा उल्लेख करत ‘भाषिणी’ ॲपच्या माध्यमातून मराठीत केलेले भाषण तात्काळ इतर भाषांमध्ये दिसण्याचा प्रयोग राबवून महाराष्ट्राने तंत्रज्ञानाच्या माध्यमातून भाषासंवादाचा नवा मार्ग दाखवल्याचे त्यांनी सांगितले.

भाषांमधील ‘‘ज्ञानभाषा’’ आणि ‘‘लोकभाषा’’ या संकल्पना स्पष्ट करताना त्यांनी प्राकृत ही सामान्यजनांची भाषा, संस्कृत ही ज्ञानभाषा आणि आजच्या काळात इंग्रजी ही प्रबंधांच्या प्रमाणामुळे ज्ञानभाषा ठरते, तर मराठी ही लोकजीवनातील संवादाची भाषा असल्याचे त्यांनी सांगितले. प्रमाणभाषा ही विविध बोलीभाषांतील शब्द, व्याकरण आणि वापरातील पद्धती एकत्र येऊन तयार होते, त्यामुळे प्रमाणभाषा ही बोलीभाषांचे ‘‘अपत्य’’ असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ‘अभिजात’ या संकल्पनेबाबत त्यांनी विविध पाश्चात्त्य विचारप्रवाह, विश्वकोषातील नोंदी आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी सांगितलेले ‘‘आदर्शानुकरण’’ व ‘‘संकेतपालन’’ हे निकष समजावून सांगितले.

मराठीच्या संवर्धन, संशोधन, अनुवाद आणि रोजगारनिर्मितीच्या दृष्टीने विभागाने एका वर्षात मोठे लक्ष्य पूर्ण करण्याचा निर्धार असल्याचे सचिव डॉ.कुलकर्णी यांनी सांगितले. मनुष्यबळ, जागा आणि प्रशिक्षण या तीन मुद्द्यांवर भर देत विविध भाषांचे वाचक, कॉन्झर्व्हेटर्स तयार करण्यासाठी प्रशिक्षणक्रम राबवले जातील, असे त्यांनी नमूद केले. निधी उभारणीसाठी सीएसआरच्या माध्यमातून मराठी उद्योजकांकडून मदत घेण्याचा पर्यायही त्यांनी सूचित केला. मराठी प्रभुत्वाशी संबंधित अनेक उद्योग-संधी उपलब्ध असून काही उद्योजकांचा टर्नओव्हर ५०० कोटींच्या पुढे असल्याचेही त्यांनी सांगितले.

संशोधनाच्या क्षेत्रात मराठीच्या १,५०० वर्षांच्या दुर्लक्षित कालखंडावर अधिक अभ्यासाची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. पुढील टप्प्यात प्रकाशन व अनुवादासाठी ‘अनुवाद अकॅडमी’ ही स्वायत्त संस्था स्थापन केली जात असल्याचेही त्यांनी सांगितले. तंत्रज्ञानामुळे मशीन ट्रान्सलेशन सक्षम होत असून मराठीतील स्पेल चेक, शब्दपर्याय, प्रेडिक्टिव्ह टायपिंग यांसारख्या सुविधा विकसित करण्यासाठी लोकांनी मोबाईलवर अधिकाधिक मराठी टाइप करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

व्याख्यानाच्या शेवटी त्यांनी अभिजात दर्जानंतरच्या नियोजनासाठी उपस्थितांच्या सूचना मागवत मराठीच्या भविष्यकालीन विकासासाठी सामूहिक सहभाग महत्त्वाचा असल्याचे स्पष्ट केले.









## जात्यावरच्या ओव्या......

तिळाची कोंद भारी
शेरभर गुळामंधी
सांगे तिळगुळ लोका
घ्या हात हातामंधी ||४६६||

नका भांडणतंडण
इसर मागचा अबोला
ठेवा हातावर तिळगुळ
खाऊन गोड बोला ||४६७||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे...



### उगवतीचे रंग


विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य

बापरे, आश्चर्यच आहे. माणसापेक्षा सुद्धा ही झाडे जास्त जगतात. राजेश उद्‌गारला.

हो राजेश, वड, पिंपळ यासारखी झाडे खूप वर्षे जगतात. हे अक्षय वृक्ष आहेत. यांना पवित्र मानून त्यांची पूजा केली जाते.

राजेशची आई शाळेत विज्ञान विषय शिकवायची. ती म्हणाली, राजेश, पिंकी , तुम्हाला माहिती आहे का की वड, पिंपळ, औदुंबर, चिंच, कडुलिंब यासारखी झाडे वातावरणातील कार्बन डाय ऑक्साईड शोषून घेतात आणि आपल्याला शुद्ध प्राणवायूचा पुरवठा करतात. पिंपळ वातावरणातील १००% कार्बन डाय ऑक्साईड शोषून घेतो तर वड आणि कडुलिंब अनुक्रमे ८० आणि ७५ टक्के कॉ डा ऑक्साईड शोषून घेतात. वातावरण शुद्ध करणाऱ्या या निसर्गाच्या गाळण्याच आहेत.



अरे वा, झाडे किती उपयोगी पडतात मानवाच्या ! राजेश म्हणाला.


अगदी बरोबर आहे राजेश, बाबा म्हणाले. पण राजेश आणि पिंकी तुम्हाला सांगतो की ही सगळी आपली देशी झाडं बरं का ! पर्यावरण शुद्धीसाठी ही फार मदत करतात. पण गुलमोहर, निलगिरी यासारखी झाडे मात्र या दृष्टीने फारशी उपयोगाची नाहीत. या झाडांची सावली फारशी पडत नाहीत. या झाडांवर पशुपक्षीही घरटे करत नाहीत. पण जे पशुपक्षांना कळते, ते मानवाला मात्र कळत नाही. बाळांनो, तुम्ही थोडावेळ आईशी बोला. तोपर्यंत मी जवळपास आणखी काही बघण्यासारखे आहे का त्याचा तपास करतो. असं म्हणून श्यामराव तिथून निघाले.

श्यामलाताई म्हणाल्या, बाळांनो, वड, पिंपळ, कडुलिंब, औदुंबर आणि आपली सगळीच झाडे अतिशय औषधी आहेत बरं का ! ते आपल्याला ऑक्सिजन तर देतातच पण आपले अनेक आजारही बरे करतात. कडुलिंबाच्या काडीने नियमितपणे दात घासल्यास दातांना कीड लागत नाही. पिंपळाची पाने तर किती सुंदर असतात. हृदयाच्या आकाराची ! जेव्हा नवीन पालवी फुटते तेव्हा ते छान गुलाबी, तांबूस असतात. मग हिरवी होतात. त्यांची सळसळ, वाऱ्यावर डोलणं किती मनमोहक असतं. पिंपळाची पाने, साल आणि मुळे औषधी असतात. पोटाच्या आजारांवर त्यांचा उपयोग होतो. पिंपळ पानांचा काढा आपले शरीर डिटॉक्स करतो म्हणजे त्यातील दोष किंवा टॉक्सिन्स काढून टाकतो. पिंपळाची फळे पक्षांचे आवडते खाद्य आहे. या वृक्षाला अश्वत्थ वृक्ष असेही म्हटले जाते. याचा उल्लेख भगवद्गीतेत सुद्धा येतो. गौतम बुद्धानी याच वृक्षाखाली तप केले. त्यांना त्या ठिकाणी दिव्य ज्ञानाची प्राप्ती झाली म्हणून त्या वृक्षाला बोधिवृक्ष असेही म्हटले जाते. बिहारमधील बोधगया येथे हा वृक्ष आहे.

(क्रमशः)



## ॥ अभंग-माधव ॥



माधव मनोहर जोशी
दादर, मुंबई.
मो. 9833159630

वाढिले असता l घमेंड व पोट l
नाही होत भेट l इच्छिताही ll१ll
करी बरबाद l लिंबातील रस l
शुद्ध गोरसास l क्षणार्धात ll२ll
नाशाचे कारण l महा अहंकार l
ना करा स्वीकार l कधी त्याचा ll३ll
माधव हा म्हणे l करा रे सत्कर्म l
सुखाचे हे मर्म l ध्यानी ठेवा ll४ll



### दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## द्वैतकल्पनानिरसन

ज्योतिर्मय साहित्य

कल्पना म्हणजे काय?


चांगलीआणि वाईट असे दोन कल्पनेचे प्रकार आहेत. कल्पना जीवन व्यापून टाकते.

१)चांगली कल्पना ईश्वरावर श्रद्धा, निर्भयता, चांगलेपणाची भावना, आशावादी पणा,यशाची खात्री या सगळ्या चांगल्या कल्पना आहेत. चांगल्या कल्पना आत्मबुध्दी पोसतात व मन मोठे विशाल करतात. ज्यांना संत बनायचे आहे किंवा ज्यांची जन्मतःच बुद्धी सात्विक आहे. जे कधीही आपपर भाव ठेवत नाहीत कधीही दुसऱ्याचें वाईट चिंतत नाहीत सतत परोपकार प्रत्येक जीवाला सुख लाभूदे असा निजचैतन्याचा ध्यास घेणारे पारमार्थिक लोक यासाठी पात्र ठरतात. यासाठी संत ज्ञानेश्वरांनी पसायदान लिहिले. की जी विश्वाला सुखी ठेवण्याची प्रार्थना केली आहे. संत तुकाराम, नामदेव, गोरा कुंभार, सावतामाळी, चोखोबा, जनाई मुक्ताई, शेगावीचा राणा श्री गजानन महाराज, अक्कलकोट चे श्री स्वामी समर्थ महाराज आणि आपण आता ज्यांचे अध्ययन करत आहोत ते स्वामी समर्थ रामदास महाराज या सर्वानी हेच सांगितले आहे की कल्पना मायेचे निवारण करते, कल्पना ब्रम्हाला थारा देते. त्याची स्थापना करते. म्हणून सतत सन्मार्गाची कास धरा. मनामध्ये वाईट विचारांना थारा देऊ नका. यासाठी संत साहित्य अभ्यासा,तिर्थाटन करा.

वाईट कल्पना

चिंताभय, हिनपणाची भावना, पुढे काय होतील याची सतत चिंता, आळशीपणाची मनोराज्ये, खलनायक विचार सरणीं सतत दुसऱ्या वर कुरघोडी करणे त्याचा अपमान करणे सदैव दुसऱ्या ला कमी लेखणे. मी पणा अहंभाव, मत्सरी स्वभाव, निंदानालस्ती करणे हीसर्व वाईट कल्पनेची ठिकाणे आहेत. अशा ठिकाणी कुणीही जास्तवेळ थांबू नये. तुमच्या जीवाला याठिकाणी धोका होऊ शकतो.

(क्रमशः)



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

## संगतीचे जीवनात अतिशय महत्त्व आहे

ज्योतिर्मय साहित्य

आयुष्यात संगतीला फार महत्त्व असते. संगतीचा परिणाम विनासायास आणि बराचसा न कळत होत असतो. संतसंगती लाभणे ही अत्यंत भाग्याची गोष्ट आहे. ती पूर्वपुण्याईमुळेच लाभते. ज्याच्याशी आपण संगत करावी, त्याचे गुणधर्म आपल्याला येऊन चिकटतात हे आपण पाहतो. समजा, काही लोकांनी इथे यायचे ठरविले. एकाने विचार केला की आपण पायीच जाऊ, दुसरा बैलगाडीने निघाला, तिसऱ्याने आगगाडीने प्रवास केला, तर चौथा मोटारने आला. सर्वजण जर एकाच ठिकाणाहून निघाले तर साहजिकच मोटारीने येणारा सर्वात लवकर पोहोचेल; म्हणजे ज्याच्याशी संगत केली त्या वाहनाचे गुणधर्म त्याला विनासायास लाभले. संगतीची दुसरी गंमत अशी की, ज्याच्या संगतीत आपण जातो त्याच्यापुढे आपले कर्तृत्व लोप पावते. इथून पुष्कळ मुले शिक्षण घेऊन पुढे कुणी वकील झाले, तर कुणी डॉक्टर झाले. परत इथे आल्यावर त्यांनी इथल्या मुलींशी लग्ने केली. त्या मुली फारशा शिकलेल्या नसतील; परंतु वकिलाशी लग्न केलेली वकिलीणबाई झाली, डॉक्टरशी लग्न केलेली डॉक्टरीण झाली. असे जर देहाच्या संगतीने सामान्य माणसाचेही गुणधर्म आपल्यात येतात, तर सत्संगतीचा परिणाम किती होत असला पाहिजे ! आपण तिकीट काढून गाडीत बसतो. आपल्या शेजारी कोण येऊन बसेल ते आपल्या हाती नसते. तो विडी ओढणारा असला आणि आपल्याला धूर सहन होत नसला तरी नाइलाजाने तिथेच बसावे लागते. व्यसनी किंवा विषयी माणसाची संगत ही अशी तापदायक, घातक असते. उलट सत्पुरुषाची संगत ही उत्तम, लाभदायी ठरते. सत्संगतीपासून सद्वासना आणि सद्विचार प्राप्त होतात.

एखादा साधू बैरागी असेल, झाडाखाली बसला असेल. तो स्वत: उपाशी असेल तर त्याच्याकडे येणारी मंडळीही उपाशी राहतील. समर्थांकडे कुणी गेला तर ते म्हणतील, "मी भिक्षेची झोळी घेतो, तूही घे; दोघेही भिक्षा मागून आणू, आणि जे मिळेल ते शिजवून खाऊ." पण संत गृहस्थाश्रमी असेल तर आपल्याकडे येणाराला तो वाटेल ते करून खायला घालील. अन्नानुसार वासना बनते, म्हणून संताघरचे अन्न मागून घेऊन खावे. संताची देहाने संगती लाभणे सुलभ नाही. तो राहात असेल तिथून आपण लांब राहात असू; आणि जवळ राहात असलो तरी प्रपंच-कामधंद्यामुळे चोवीस तासांत त्याच्या सान्निध्यात कितीसे राहता येणार ? मग देहसंगतीचा लाभ कितीसा मिळेल ? तेव्हा नामाची संगत हीच सर्वांना सदासर्वकाळ लाभण्यासारखी उत्तम सत्संगत होय.

परमार्थ साधण्यास सत्संगती फारच उपयोगी पडते.

***



## श्री संत ज्ञानेश्वर
### अभंग व अर्थ

अभंग २८

नभ नभाचेनि सकें ।
क्षोभु वाहिजे काळिंदी जळें ।
सासिंनले जगाचे डोळे ।
तें रुप पाहावया । भलतैसी हांव ।
मना न पुरे तेथींची धांव ।
लावण्यसिंधु सिंव
सांडूनि जातो गे माये ॥१॥
सुलभ परमात्मा गे माये।
मन मुरोनि देखणेपणा उरी ।
याचि कारणें उभा भिवरेतीरीं ।
अनुपम्य जयाची थोरी गे माये ॥
ध्रु०॥ काळिंदीजळाचा भोंवरा ।
कीं माजी वेढूनि इंदीवरा ।
माळ बांधोनियां मधुकरा ।
रोमांमाजी ॥२॥
सकल सिध्दिंचा मेळां ।
तेंवि विभूति शोभे भाळा ।
मुगुटीं रत्नकिळा ।
लिंग अनुपम्य गे माये ॥३॥
क्षीरसागरींचें । निवांत सुख ।
असो हें निमासुरें मुख ।
श्रीयेचें मनोहर देख ।
टवकारलें दोंभागीं ॥
पहावया ऊरंचीं शोभा ।
सकळ देवाची प्रभा ।
तेथें तारांगणें कैंचीं नभा।
लेइला गे माये ॥४॥

क्रमश : ......



### आरोग्य संजीवनी

## पायऱ्या (जिना) चढण्याचे फायदे.....

ज्योतिर्मय साहित्य

मधुमेहाचा धोका कमी करणे...*

पायऱ्या चढल्याने रक्तातील साखरेची पातळी नियंत्रणात राहते, ज्यामुळे मधुमेहाचा धोका कमी होतो.

उत्तम संतुलन...*

पायऱ्या चढण्याने संतुलन सुधारते, ज्यामुळे पडण्याचा धोका कमी होतो,

हृदय व रक्तवाहिन्यांचे आरोग्य...*

पायऱ्या चढल्याने हृदयाची गती वाढते, रक्ताभिसरण सुधारते आणि ऑक्सिजनचा पुरवठा वाढतो. नियमित पायऱ्या चढल्याने हृदयरोग, उच्च रक्तदाब आणि स्ट्रोकचा धोका कमी होऊ शकतो, असे एका अभ्यासात दिसून आले आहे.

स्नायू मजबूत करणे...*

पायऱ्या चढणे हे पायांचे स्नायू बळकट करते आणि शरीर अधिक लवचिक बनण्यास मदत करते.

वजन कमी करणे...*

पायऱ्या चढणे हा एक उत्कृष्ट एरोबिक व्यायाम आहे, ज्यामुळे शरीरातील चरबी कमी होण्यास मदत होते.

मानसिक आरोग्य...*

पायऱ्या चढल्याने डोपमाइन आणि सेरोटोनिन यांसारखी नैसर्गिक रसायने बाहेर पडतात, ज्यामुळे मूड सुधारतो, तणाव कमी होतो आणि मानसिक आरोग्य सुधारते...

पायऱ्या चढणे-उतरणे हा अतिशय तीव्र व्यायाम प्रकार आहे. याचे प्रचंड एरोबिक फायदे आहेत. एक पायरी चढताना तुम्ही सुमारे ०.१७ कॅलरीज जाळू शकता. दररोज किमान अर्धा तास अशाचप्रकारे पायऱ्या चढून वर-खाली जात असाल तर कॅलरीज बऱ्याच प्रमाणात बर्न होतात. दररोज जिन्याचे पाचपेक्षा अधिक टप्पे (एक टप्पा साधारण ९ ते ११ पायऱ्या) म्हणजे ५० पावलं किंवा पायऱ्या चढल्यास त्याचा संबंध अ‍ॅथेरोस्क्लेरोटिक हृदविकाराच्या आजारांचा (एएससीव्हीडी) धोका कमी होण्याशी आहे. हा आजार धमन्यांमध्ये थर जमल्यामुळे होतो.

सेच जे जिना चढणं टाळतात, त्यांच्यासाठी लिफ्ट किंवा एलिव्हेटर ऐवजी पायऱ्या चढण्याचा पर्याय निवडणं हा व्यायामाचा एक उत्तम पर्याय ठरू शकतो. तो तुमच्या शरीराला आणि मनाला फायदेशीर ठरू शकेल. त्यामुळे आजपासूनच पायऱ्या चढणं सुरू करा.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

दररोज ३० सेकंद हात एकमेकांवर घासा आणि बघा शरीरातले चमत्कार!

वाचून तुम्हीही म्हणाल *"अरे वा! इतकं सोपं आणि फायदेशीर?"

हिवाळ्यात थंडी कमी करण्यासाठी किंवा कोणाला चक्कर आल्यावर आपण हात/तळपाय घासतो.

पण हा साधा उपाय किती मोठे फायदे देतो हे तुम्हाला माहित आहे का?

चला जाणून घेऊया

तळहात एकमेकांवर घासण्याचे अद्भुत फायदे

१) ब्लड सर्क्युलेशन झपाट्याने वाढतं

हात घासल्याने शरीरभर रक्तप्रवाह वाढतो,

थकवा गायब होतो आणि शरीरात ताजेतवानेपणा येतो.

२) डोळ्यांचा ताण कमी होतो दृष्टी सुधारते

हात गरम करून १० सेकंद डोळ्यांवर ठेवा

उष्णतेमुळे डोळ्यांचा थकवा कमी होतो, चमक वाढते आणि स्ट्रेसही कमी होतो.

३) टेंशन, स्ट्रेस त्वरित कमी!

ही छोटी क्रिया मेंदूला रिलॅक्स करते, मूड पॉझिटिव्ह बनतो आणि मेंदू शांत होतो. सकाळी केल्यास दिवस ऊर्जा भरून सुरू होतो.



## लघु बोधकथा

### वेळ

लष्करातला एक घोडा रस्त्याने चालला होता. त्याच रस्त्याने पाठीवरून ओझे घेऊन जाणा-या एका गाढवाला घोड्याने पाहिले व म्हणाला,"अरे मूर्ख प्राण्या, पटकन बाजूला हो नाहीतर माझ्या पायाखाली फुकट तुडविला जाशील." त्याचे ते उर्मटपणाचे बोलणे ऐकून ते गाढव निमूटपणे बाजूला झालं पण त्या घोड्याचा उमदेपणा व त्याचा रूबाब, ऐट पाहून ते गाढव मनातल्या मनात म्हणालं,"देवा, हा जन्म मला ओझे वाहणा-या गाढवाचा दिला आहेस पण पुढचा जन्म मात्र मला अशा लष्करी, उमद्या जातीच्या घोड्याच्याच पोटी घाल मात्र याचा उर्मटपणा मला देऊ नकोस."
थोड्याच दिवसांनी एका लढाईत तो घोडा जखमी झाला व लढाईच्या दृष्टीने निकामी झाला तेव्हा त्याच्या सरदार मालकाने त्याला एका कुंभाराला विकले. त्या घोड्याच्या दुर्दैवाने त्याचा मालक व त्या गाढवाचा मालक एकच होता. दोघांनाही आता कुंभाराचे साहित्य घेऊन बाजारात जाणे भाग असे. त्या उमद्या पण जखमी घोड्याला आपल्यासारखेच ओझे वाहताना, हमाली करताना पाहून आता गाढवाने पुन्हा प्रार्थना केली," हे देवा, या लष्करी घोड्याचा शेवटचा काळ किती कठीण आहे रे,
प्रथम वैभव भोगून हा आता अत्यंत कठीण दिवस काढत आहे,
याच्या चलतीच्या काळात हा उन्मत्तपणे वागल्यामुळे याच्या या परिस्थितीबद्दल कोणालाही याच्याबद्दल सहानुभूतीही राहिली नाही.
देवा, असा उद्दाम व उर्मट घोडा बनण्यापेक्षा मी आहे तो गाढवच बरा आहे."
तात्पर्य :- तुम्ही रसिक वाचक कथेतील मर्म जाणून घ्याल अशी अपेक्षा आहे.

# थोपटे महाविद्यालयाचे कुरुंजी येथे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर संपन्न

ज्योतिर्मय साहित्य

भोर, पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या मार्गदर्शनाखाली तसेच राजगड ज्ञानपीठाचे अनंतराव थोपटे महाविद्यालय भोर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने ''शाश्वत विकासासाठी युवक: पाणलोट व पडीक जमीन व्यवस्थापन'' या संकल्पनेवर आधारित विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन कुरुंजी ता.भोर येथे करण्यात आले होते सदर सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिराचा समारोप शुक्रवार दिनांक २३ जानेवारी २०२६ रोजी उत्साह पूर्ण वातावरणात संपन्न झाला. या शिबिराच्या आयोजनाची माहिती राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमअधिकारी प्रा. जनार्दन गावित यांनी दिली. समारोप समारंभासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य संजय नेवसे, उपप्राचार्य प्रो.डॉ.सविता गायकवाड, आश्रम शाळेचे मुख्याध्यापक श्री. अंकुश चौगुले, कुरुंजी गावचे लोकनियुक्त सरपंच सौ. शकुंतला नलावडे,उपसरपंच श्री. विठ्ठलनाना वरखडे तसेच अध्यक्ष भोर तालुका राष्ट्रीय मानवाधिकार संघ श्री. ज्ञानेश्वर (माऊली) नलावडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच यावेळी कार्यक्रम




अधिकारी डॉ. वर्षा कोरे, कार्यक्रम अधिकारी प्रा. दिनेश राजपुरे, कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रदीप साळवे, श्री. विजय चव्हाण यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने व राष्ट्रीय सेवा योजनेच्या गीताने करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व शिबिराची संकल्पना राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. स्वप्निल पाटील यांनी मांडली. आपल्या प्रास्ताविक पर मनोगतात त्यांनी शिबिराच्या सात दिवसांच्या कालावधीत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची सविस्तर माहिती उपस्थितांना दिली. या शिबिरामध्ये ग्रामस्वच्छता, वृक्षारोपण, पाणी संवर्धन, पाणलोट क्षेत्र विकास, पडिक जमिनीचे व्यवस्थापन, सामाजिक जनजागृती आरोग्य व स्वच्छता विषय उपक्रम तसेच विविध सामाजिक प्रश्नावर आधारित प्रबोधनात्मक कार्यक्रम राबविण्यात आल्याचे सांगितले. प्रमुख पाहुणे सरपंच सौ. शकुंतला नलावडे यांनी आपल्या मार्गदर्शन पर भाषणात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या माध्यमातून गावात राबविण्यात आलेल्या लोककल्याणकारी उपक्रमांचे कौतुक केले. ग्रामस्वच्छता, वृक्षारोपण, जनजागृती, जलसंधारणाची कामे तसेच विविध सामाजिक उपक्रमामुळे गावांचा सर्वांगीण विकास साधला जात असल्याचे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी सेवाभाव व राष्ट्रप्रेम निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य राष्ट्रीय सेवा योजना करीत असल्याचे त्यांनी सांगितले. महाविद्यालयाचे प्राचार्य. संजय नेवसे यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांच्या कार्याची विशेष कौतुक केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक समाजोपयोगी कार्य करत असून आपल्या कार्यातून समाजासमोर एक आदर्श निर्माण करीत आहे. देश घडवण्यासाठी प्रामाणिकपणे कार्य करणारे युवक समाजासाठी अत्यंत आवश्यक आहेत असे प्रतिपादन त्यांनी केले. तसेच त्यांनी शिबिरातील सर्व उपक्रम यशस्वीपणे राबविल्याबद्दल सर्व कार्यक्रम अधिकाऱ्यांचे, स्वयंसेवकांचे आणि ग्रामस्थांचे अभिनंदन केले. सदर समारोप समारंभ प्रसंगी कुरुंजी गावातील ग्रामस्थ, तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी केले. या शिबिरासाठी राजगड ज्ञानपीठाचे अध्यक्ष मा.आमदार संग्राम दादा थोपटे, संस्थेच्या मानद सचिवा सौ. स्वरूपाताई थोपटे यांनी सदिच्छा दिल्या.समारोप समारंभ कार्यक्रम उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात यशस्वीरित्या पार पडला.




## मनपा शाळेतील राज्य क्रीडा दिनानिमित्त क्रीडा महोत्सवाचे उत्साहात उद्घाटन

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर : महानगरपालिका केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय एन ७ सिडको छत्रपती संभाजीनगर शाळेत ऑलिंपिक पदक विजेते महान कुस्तीपटू खाशाबा जाधव यांच्या जयंतीनिमित्त व राज्य क्रीडा दिनानिमित्त क्रीडा महोत्सवाचे आयोजन शाळेचे मा. मुख्याध्यापक श्री शेख अहमद पटेल सर यांच्या मार्गदर्शनानुसार २४ जानेवारी २०२६ रोजी करण्यात आले होते. क्रीडा महोत्सवाचे अध्यक्षपद छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे उपायुक्त तथा शिक्षणविभाग प्रमुख मा. श्री अंकुश पांढरे सर यांनी भूषवले. प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र ऑलिंपिक संघटनेचे सचिव मा. श्री. उदय डोंगरे सर उपस्थित होते. प्रभागाचे नगरसेवक मा.श्री.गणेश भाऊ नावंदर, मा. श्रीमती सुरेखाताई सानप, मा. श्री शिवाजीभाऊ दांडगे, मा. श्रीमती अर्चनाताई चौधरी क्रीडा महोत्सवाचे उद्घाटक म्हणून उपस्थित होते. मा. श्रीमती तिलोत्तमा मापारी, मा. श्री. किशोर दांडगे, मा. श्री. केशव तांबे, मा. श्री. अंबादास कऱ्हाळे, मा. श्री. दिनेश पचलोरे, मा. श्रीमती अनिता भगुरे उपस्थित होते.एन-७ केंद्रीय शाळेचे विद्यार्थी व केंद्रशाळेच्या अंतर्गत असलेल्या ब्रिज वाडी, मिसारवाडी, एन-११ शाळेच्या विद्यार्थ्यांनी




या क्रीडा महोत्सवात सहभाग घेतला होता.

सदरील क्रीडा महोत्सवात खो-खो, कबड्डी,१०० मीटर रेसिंग, गोळा फेक, क्रिकेट, रस्सी खेच अशा विविध खेळांचा समावेश करण्यात आला होता. विद्यार्थ्यांनी खिलाडू वृत्तीने सर्व खेळांमध्ये सक्रियपणे सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडा शिक्षक श्री. सागर मगरे, श्री. मनोज अग्रवाल, श्री. दीपक पडोळ, श्री. प्रितीश सराटे, श्रीमती वैशाली देशमुख यांनी केले. शाळेतील इतर शिक्षक व शिक्षिका यांनी कार्यक्रमाचे यशस्वीपणे राबवण्यासाठी सक्रियपणे सहभाग घेतला.

कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी मा. श्रीमती सुनंदा आरदवाड, मा श्रीमती अनिता शेटे, मा. सौ संगीता आंबेकर,मा. श्रीमती मंगला महाजन, मा. श्रीमती सुनिता पाटील, मा. श्रीमती वैशाली सुरडकर,मा. श्रीमती अंजली कुलकर्णी,मा. श्रीमती स्वाती घोडतुरे, मा. श्री मनोज अग्रवाल, मा. श्रीमती शिल्पा बहुरे, मा. श्रीमती वैशाली देशमुख, मा. श्रीमती मंजुश्री राठोड, मा. श्री व्यंकट जाधव, मा. श्रीमती शुभांगी चव्हाण, मा. श्री दीपक पडोळ, मा. श्री संदीप कळंबे, मा. श्रीमती फिरदोस नदाफ, मा. श्रीमती सबासदफ सिद्दिकी, मा. श्रीमती पल्लवी क्षीरसागर, मा. श्री. पल्लवी भांडारकर, मा. श्री. ज्ञानेश्वर आसोलकर, मा. श्री. प्रितीश सराटे, मा. श्री. सागर मगरे, मा. श्री. सुशील दांडगे, मा. श्रीमती अश्विनी घोडके, मा. श्रीमती अंकिता बोचरे या शिक्षक शिक्षिकांनी आणि मा. श्री.रमेश देवडे,

मा. श्री. विजय गायकवाड या सेवकांनी सक्रियपणे सहभाग घेतला.

## दोस्ती फाउंडेशनचा लोककला स्मृतीगौरव राज्यस्तरीय पुरस्कार मनोज अग्रवाल यांना जाहीर

ज्योतिर्मय साहित्य

अहिल्यानगर :- दोस्ती फाउंडेशन अहिल्यानगरतर्फे विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या गुणवंत व्यक्तींना राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येत आहे.



साहित्यिक मनोज अग्रवाल यांना दोस्ती फाउंडेशनचा लोक कलावंत पै.मजनूभाई शेख स्मृतीगौरव कथालेखक पुरस्कार जाहीर करण्यात आल्याचे फाउंडेशनचे अध्यक्ष मा.रज्जाक शेख सुप्रसिद्ध गझलकार, व सचिव आनंदा साळवे यांनी पत्राद्वारे कळविले आहे.

सदर समारंभ ३१ जानेवारी २०२६ रोजी शासकीय विश्रामगृह श्रीरामपूर, येथे होत असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. प्रा. महावीरसिंग चौहान ज्येष्ठ साहित्यिक तथा प्रा.महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी, प्रमुख अतिथी राणीताई सोनवणे उपविभागीय प्रादेशिक अधिकारी (आरटीओ) श्रीरामपूर यांच्या शुभहस्ते पुरस्कार वितरण , संदीप बोरकर प्रदेश अध्यक्ष दिव्यांग लोककलावंत न्याय हक्क संघर्ष समिती हे उद्घाटक आहेत. श्री. सुभाष सोनवणे जेष्ठ साहित्यिक, पोलीस अधिकारी , डॉ.सलीम शेख बैतुशिपा फाउंडेशन ,यांच्या प्रमुख उपस्थिती कार्यक्रम होत आहे..

श्री. मनोज अग्रवाल यांचा पहिला कविता संग्रह चैतन्यवेल प्रसिद्ध झाला आहे. त्यांनी मराठी, हिंदी व इंग्रजी या तिन्ही भाषांत कथालेखन केले आहे. विविध वर्तमानपत्रात मनोज अग्रवाल यांच्या कविता, कथा, ललित लेख प्रकाशित झाले आहेत. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये राज्यस्तरीय साहित्य संमेलन मध्ये त्यांचे कविता वाचन कार्यक्रम झालेले आहेत.या पुरस्काराबद्दल साहित्यिक,मित्र, वाचकाकडून त्यांचे अभिनंदन होत आहे.




# क्रांतीकारक वीरेंद्रनाथ दत्तगुप्त

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

शमसुल आलम याची हत्या केल्यानंतर ताबडतोब कलकत्ता उच्च न्यायालयात एक खटला दाखल करण्यात आला. या खटल्याला हावडा-सिबपूर षडयंत्र नावाने ओळखले जाते. या खटल्यामध्ये 'बाघा जतिन' यांच्यासह ४८ लोकांना अटक करण्यात आली. शमसूल याची हत्या करण्यामध्ये या सर्वांचा सहभाग आहे असे ब्रिटिश पोलिसांचे म्हणणे होते. पण वीरेंद्रनाथ यांनी जबाबात कोणाचेही नाव न घेतल्याने या सर्वांवर आरोप सिद्ध करणे ब्रिटिश शासनाला शक्य झाले नाही. बाघा जतिन यांचे मूळ नाव ज्योतिंद्रनाथ मुखर्जी होते. त्यांना बाघा जतिन हे उपनाम मिळाले होते. ते जुगांतर पार्टीचे प्रमुख नेते होते. ज्यांनी आपले शिष्य वीरेंद्रनाथ दत्तगुप्त यांना शमसुल आलम या गुप्त खात्यातील डीएसपी याला ठार मारण्यास सांगितले होते. शमसुल आलम हा खुदिराम बोससह ४७ क्रांतीकारकांना अलीपूर बॉम्ब खटल्यासाठी अटक करण्यासाठी जबाबदार होता, ज्याने अनुशासन समितीच्या क्रांतीकारकाचे नेटवर्क उध्वस्त केले होते. वीरेंद्रनाथ दत्तगुप्त यांना मुंबईतील आर्थर रोड जेलमधील फाशी घरात फाशी देण्यात आली. हे ठिकाण ब्रिटिश काळात मुंबईतील प्रमुख फाशी केंद्र होते. जेथे क्रांतीकारकांना फाशी दिले जाई. वीरेंद्रनाथ दत्तगुप्त हे ''वंदे मातरम'' चा



घोष देऊन फाशीवर गेले, ज्यामुळे तुरूंगात सन्नाटा पसरला. या प्रकरणात २९ जानेवारी १९१० रोजी कलकत्ता कोर्टात ४८ पैकी ३३ लोकांची सूटका करण्यात आली आणि बाघा जतिन'', नरेंद्रनाथ भट्टाचार्य यांना १ वर्षे कारावास व इतरांना किरकोळ शिक्षा देण्यात आल्या. वीरेंद्रनाथ दत्तगुप्त यांच्या ऐतिहासिक स्वातंत्र्यलढ्यातील नोंदी बरोबरच त्यांचे वडील उमाचरण दत्तगुप्त आणि आई बसंतकुमारी देवी यांचीही नोंद त्यांच्याबरोबर झालेली आहे.

अलीपूर बॉम्ब खटल्यामध्ये खुदिराम बोसला पकडून दिले त्या सब इन्स्पेक्टर नंदलाल बॅनर्जीला कलकत्त्यास ९ नोव्हेंबर १९०८ ला ठार करण्यात आले.पण वध करणाऱ्याचा कधीही पत्ता लागला नाही. सुकुमार, केशव डे आणि आनंदप्रसाद घोष या फितुरांना याच सुमारास देहान्त शासन करण्यात आले. यानंतर सरकारी दडपशाही एका बाजूला वाढत होती तर दुस-या बाजूला बंगालमधील गुप्त समितीच्या यशस्वी हत्यांना व रोमांचकारी दरवड्यांना भर आलेला होता. ब्रिटिश अधिकारी भयभीत झाले होते. ११ ऑक्टोबर १९०९ ला डाक्याजवळच्या राजेंद्रपूर स्टेशनापलीकडे गाडीवर आक्रमण करून २३ सहस्त्र रुपयांचा सरकारी खजिना लुण्याची घटना सरकारला चांगलीच शह देणारी होती. मनमोहन डे, सब इन्स्पेक्टर राजकुमार, इन्स्पेक्टर मनमोहन घोष, शरचंद्र चक्रवर्ती, मि. कौली अशा सरकारी अधिका-यांच्या हत्यांनी साऱ्या बंगालमध्ये क्रांतीकारकांविषयी एक प्रकारची दहशत उत्पन्न झाल्याविना राहिली नाही. बंगालच्या






फाळणीच्या घटनेनेच बंगालमधील असंतोषाच्या ज्वालामुखीचे हे भयानक उद्रेक पसरत आहेत हे ओळखून ती फाळणी रद्द करावयाचें सरकारने ठरविलें व लॉर्ड कर्झनने लावलेल्या या आगीवर १२ डिसेंबर १९११ रोजी झालेल्या दिल्ली येथील दरबारात सम्राट पंचम जॉर्जने बंगालची फाळणी रद्द झाल्याची घोषणा करून पाणी ओतण्याचा प्रयत्न केला.

पण स्वातंत्र्यलढ्याची आग इतकी भडकलेली होती कीं त्यांने ती शांत होण्याऐवजी ती अधिक वाढली आणि भडकली. बंगालमध्ये गुप्त समित्यांचे कार्य किती सुव्यवस्थितपणे चालू होते याचे एक उदाहरण कलकत्त्याच्या रोडा ॲन्ड कंपनी या बंदुकांच्या प्रख्यात दुकानांतील चोरीचे देता येईल. या दुकानांत दि. २६ ऑगस्ट १९१४ रोजी शस्त्रे व काडतुसे यांच्या २०२ पेट्या यावयाच्या होत्या. ज्या कारकुनाला या पेट्या आणावयाचे काम देण्यात आले होते त्याने १९२ पेट्या व्यवस्थित आणून दिल्या आणि राहिलेल्या १० पेट्या आणण्यासाठी तो जो गेला तो स्वतः व त्या पेट्या कंपनीच्या दुकानांत पुन्हा कधीही आल्या नाहीत.

ज्याप्रमाणे बंगालची फाळणी रद्द करण्यात आली तशीच कलकत्ता ही ब्रिटिशांची राजधानी दिल्लीला नेण्याची घोषणाही १२ डिसेंबर १९११ रोजी करण्यात आली. ही घोषणा सम्राट जॉर्ज पंचम यांच्या राज्याभिषेकानिमित्त झाली. बंगाल फाळणी रद्द आणि त्याचबरोबर राजधानी बदल क्रांतीकारक चळवळीमुळे कलकत्ता असुरक्षित असल्याने करण्यात आला. दिल्ली येथे राजधानी प्रत्यक्षात पूर्ण प्रक्रिया होऊन १९३१ मध्ये स्थलांतरित झाली.

वीरेंद्रनाथ दत्तगुप्त यांच्यासाठी २१ फेब्रुवारी हा बलीदान दिवस म्हणून ओळखला जातो. ज्यांच्यामुळे क्रांतीकारकांना प्रेरणा मिळाली. त्यातील वीरेंद्रनाथ दत्तगुप्त हे स्वातंत्र्यलढ्यातील प्रमुख नांव आहे.



# साहित्य क्षेत्राच्या बाहेरील मंडळींनी कधीही साहित्य संस्थांमध्ये हस्तक्षेप करू नये - मा. नितीन गडकरी

ज्योतिर्मय साहित्य

नागपूर : महोदय, आपले श्रीपाद भालचंद्र जोशी यांना लिहिलेले पत्र मिळाले.

आपण विदर्भ साहित्य संघाच्या निवडणुकीत अध्यक्षपदाचा अर्ज भरण्यास एका संबंधित अवाङ्मयीन, राजकारणी उमेदवारास सांगितल्याचा आपल्या नावे चाललेला जो अपप्रचार आपल्या ध्यानात आम्ही आणून दिला त्याची तातडीने दखल घेत आपला कोणताही असा हस्तक्षेप नसल्याचा नि:संदिग्ध शब्दात यथोचित खुलासा करणारे पत्र पाठविले, तसेच जाहीर खुलासा देखील केल्याने, साहित्य क्षेत्राबाहेरील,अवाङ्मयीन, राजकारणी व व्यावसायिक वृत्तीच्या पदलालसेला त्यायोगे लगाम लावला गेला. ते अतिशय आवश्यक होते. त्याबद्दल आपले मन:पूर्वक आभारी आहोत.


हे करताना विदर्भ साहित्य संघाबद्दल आपण जे गौरवोद्गार काढले त्याबद्दलही आभारी आहोत कारण या संस्थेच्या शंभर वर्षांच्या प्रवासातील आम्ही सुमारे पन्नास वर्षांचे विनम्र सहप्रवासी, पदाधिकारी, कार्यकर्ते आहोत, हे आपण जाणताच.

आपण खुलासा करताना, उलट राजकारण्यांनी, व्यावसायिकांनी किंवा साहित्य क्षेत्राच्या बाहेरील मंडळींनी कधीही साहित्य संस्थांमध्ये हस्तक्षेप करू नये असे आपले नेहमीचे

म्हणणेही पुनः अधोरेखित केले.त्यायोगे विदर्भ साहित्य संघाच्या अध्यक्षपदी वाङ्मयीन व्यक्तीच हवी ही आमची भूमिकाही अधोरेखित केली गेली, त्याबद्दल आपले विशेष आभारी आहोत.

विदर्भ साहित्य संघ आम्ही गेल्या चार दशकांहून अधिक काळ, सर्वांना सामावून घेत, सर्वसमावेशक करत, सर्वांना तो आपला वाटावा असाच चालवत आणला होता हे आपण जाणताच.त्यातून सदस्यांचा जो विश्वास आम्ही कमावला होता त्यामुळे निवडणुका आपोआपच टळत असत.

तो विश्वास गेल्या सुमारे दशकभरापासून असणाऱ्या पदाधिकाऱ्यांनी गमावला असल्याने,ते कोणाशीच संवादीच न राहिल्याने, स्वलाभकेंद्री होत गेल्यानेच



एवढ्या मोठ्या प्रमाणावर असंतोष उफाळून आला आहे.त्यात भर व्यावसायिक व राजकारण्यांनी संस्थेला आपल्या वाङ्मयबाह्य हितासाठी वेठीला धरत व त्यासाठी आपल्यासारख्या लोकप्रिय केंद्रीय

मंत्र्याच्या नावाचा दुरूपयोग करत अध्यक्षपदासाठी संस्थेत कधीही सक्रिय नसणारा, राजकारणी,अवाङ्मयीन, व्यावसायिक उमेदवार उभा करण्याची पडली.त्याविरूद्धही सदस्यांचा मोठा असंतोष उफाळून आला व म्हणून आपणास पत्र लिहून तसदी द्यावी लागली व खुलासा करण्याची विनंती करावी लागली.

एवढे होऊनही आमचा प्रयत्न अध्यक्ष व कार्यकारी मंडळाची निवडणूक नेहमीप्रमाणे, सर्वांना सामावून घेत, संस्थेच्या निवडणुकीवर संभवणारा सुमारे १५ लाखांचा खर्च वाचवण्याचाच आहे. अडसर फक्त संबंधित राजकारणी, व्यावसायिक,अवाङ्मयीन , साहित्यबाह्य हेतूच्या, आपल्या नावाचा दुरूपयोग करून झालेल्या उमेदवारीचाच तेवढा आहे.

राजकारण्यांनी, व्यावसायिकांनी, साहित्य क्षेत्राच्या बाहेरील मंडळींनी साहित्य संस्थांमध्ये हस्तक्षेप करू नये हे जे आपण म्हटले आहे त्यापासून संबंधित उमेदवार व त्यांची उमेदवारी उभी करणारे बोध घेतील अशी आशा आहे.

तसे झाले नाही व ते आपल्या या भूमिकेचाही अव्हेर करून अडेलतट्टू पणाने उभेच राहिले तर निवडणूक नुसती अटळच नव्हे तर प्रथमच नगरपरिषद, ग्रामपंचायत निवडणुकीप्रमाणे त्यातील संभवतात त्या सर्व राजकीय डावपेचांमध्ये अडकून भ्रष्ट होण्याचा धोका वाढून ठेवला आहे.

अशा वेळी तुम्ही आम्ही केवळ बघ्याची भूमिकाही घेऊन चालणार नसल्याने साहित्य,नाट्य,कला क्षेत्र सजगपणे आणि विवेकाने या आक्रमणाविरूद्ध संघटित होऊन निवडणुकीत उतरण्याचीच शक्यता अधिक आहे.तसे झाल्यास आपल्या शुभेच्छा अशा मंडळींना कृपया असतील ही अपेक्षा.

आपला : श्रीपाद भालचंद्र जोशी, प्रमुख संयोजक - मराठीच्या व्यापक हितासाठी, संयोजक - वैश्विक मराठी परिवार, संयोजक - महाराष्ट्र सांस्कृतिक आघाडी, अध्यक्ष - अ.भा. मराठी भाषा-संस्कृती परिषद, पूर्वाध्यक्ष - अ.भा. मराठी साहित्य महामंडळ, सदस्य - राज्य भाषा सल्लागार समिती

# इतिहासाबद्दल सजग दृष्टी देणारं अधिवेशन

ज्योतिर्मय साहित्य

कणकवली : येथे १६ आणि १७ जानेवारी रोजी अखिल महाराष्ट्र इतिहास परिषदेच्या ३३व्या राष्ट्रीय अधिवेशनात शोधनिबंध सादर करण्यासाठी आणि चर्चेसाठी मी संशोधक म्हणून निमंत्रित होते.

महाराष्ट्रातून तसंच महाराष्ट्राबाहेरूनही अनेक इतिहास संशोधक, अभ्यासक आणि इतिहास-संलग्न विद्याशाखांचे संशोधक तिथे निमंत्रित होते. मी लिहिलेल्या महाभारताधिष्ठित ललितगद्यातील द्रौपदी ह्या विषयावरच्या शोधनिबंधावर अधिवेशनाच्या (प्राचीन विभाग) आंतरविद्याशाखीय चर्चासत्रात मी विवेचन केलं.

अधिवेशन-सत्रांनंतर आयोजकांनी रात्री कोकणातल्या स्थानिक कलाकारांचे अतिशय सुंदर असे सांस्कृतिक कार्यक्रम आणि विशेष म्हणजे दशावतारी खेळ आमच्यासाठी आयोजित केले होते.

इतिहास, विशेषतः उत्तर कोकणातील ठाणे, मुंबई ते तळकोकण, गोवा, कर्नाटक ह्या प्रदेशांतील




डॉ. निर्मोही फडके

कातळशिल्पं, दगडी शिल्पं इ. बाबतीत ज्येष्ठ आणि नव्या इतिहास संशोधकांनी सादर केलेले शोधनिबंध अतिशय माहितीपूर्ण आणि एक वेगळा अनुभव देणारे होते. औपचारिक आणि अनौपचारिक चर्चाही उद्बोधक झाल्या. त्या निमित्तानं भरवलेल्या छोटेखानी इतिहास-ग्रंथप्रदर्शनात मौलिक पुस्तकांचा खजिना पाहायला मिळाला. कणकवलीतल्या छोट्या वीरांगनांनी सादर केलेले तलवारबाजी, दांडपट्टा इ. आविष्कार कौतुकास्पद होते. कणकवली महाविद्यालय आणि अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद ह्या दोन्ही संस्थांनी संयुक्तपणे केलेलं ह्या अधिवेशनाचं आयोजन उत्तम होतं.

ह्या वर्षी पहिल्यांदाच परिषदेनं आंतरविद्याशाखांचं चर्चासत्र ठेवल्यामुळे इतिहास आणि साहित्यासह इतर विषयांच्या संशोधकांना सहभागी होता आलं.

सोशल हेरिटेज ह्या तीन भाषांत प्रकाशित होणाऱ्या राष्ट्रीय आंतरविद्याशाखीय संशोधन मासिकाच्या तीन खंडांमध्ये, अधिवेशनातल्या चर्चासत्रांत संशोधकांनी सादर केलेले शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत.

नव्या पिढीमध्ये इतिहासाबाबतीत भाबडं प्रेम न रुजवता, त्यांना इतिहासाचा वस्तुनिष्ठ अभ्यास करण्याची समग्र दृष्टी देणं आज महत्त्वाचं आहे. कणकवलीतलं इतिहास अधिवेशन हे त्यासाठी केलेल्या प्रयत्नाचं एक उत्तम उदाहरण आहे.

# रंजना सानप यांचा हळदी कुंकू कार्यक्रमातून सामाजिक संदेश

ज्योतिर्मय साहित्य



सातारा : रंजना सानप यांनी संक्रांती सणनिमित्त ठेवलेल्या हळदी कुंकू कार्यक्रमातून सामाजिक संदेश दिला. महिलांनी हळदीकुंकू कार्यक्रमात वस्तूचे वाण देण्याऐवजी विचार समृद्ध करणारे वाण देणे गरजेचे आहे असे विचार त्यांनी मांडले. त्यांनी महिलांना वाण म्हणून पुस्तके वाटप केली.

वाचनाचे महत्त्व पटवून दिले. त्याचबरोबर त्यांनी लेक वाचवा अभियान याचाही संदेश हळदी कुंकू कार्यक्रमातून दिला.लेक वाचवा, लेक शिकवा आणि लेक वाढवा हा संदेश सर्वांसाठीच मोलाचा ठरला. मुला मुलींमध्ये प्रमाणाचे निर्माण झालेले असंतुलन आणि त्यामुळे समाजातील विवाहाच्या वाढत जाणाऱ्या समस्या, विकृतीचा सामना कसा करावा या विषयांच्यावर चर्चा करण्यात आली. स्त्रीयांनी सक्षम व्हायला हवे, अन्यायाविरुद्ध प्रतिकार करायला हवा.

विधवा स्त्रियांची ओटी भरून समाजासमोर वेगळा आदर्श निर्माण केला. सांस्कृतिक सामाजिक कार्यक्रमातून असा संदेश प्रत्येक जणमनात रुजायला हवा. त्यासाठी त्यासाठी समाजातील सर्वच घटकांनी प्रयत्न गरजेचे आहे असा विचार त्यांनी मांडला. त्या शैक्षणिक, साहित्यिक कार्याबरोबर सामाजिक कार्यातही नेहमीच अग्रेसर असतात.

# चुडाराम बल्हारपुरे यांच्या जत्रा घडली नागोबाची या महानाट्यास नटसम्राट पुरस्कार जाहीर

## झाडीपट्टी नाटकाचा गोंदिया येथे सन्मान


ज्योतिर्मय साहित्य

गडचिरोली - मातोश्री जिजाऊ बहुउद्देशीय सामाजिक शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अर्जुनी/ मोरगाव जि. गोंदिया या संस्थेतर्फे दरवर्षी मराठी साहित्यिकांची उत्कृष्ट पुस्तक निर्मीतीसाठी स्पर्धा घेण्यात येते. व पुरस्कारप्राप्त साहित्यिकांना अखिल भारतीय मातोश्री जिजाऊ परिवर्तन मराठी साहित्य संमेलनात मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येते. राष्ट्रीय स्तरावर अत्यंत मानाचा समजला जाणाऱ्या या पुरस्काराकरीता मराठी नाट्य वाड्.मय प्रकारात यंदा झाडीपट्टीतील नाटककार चुडाराम बल्हारपुरे यांच्या मधुश्री पुणे प्रकाशित जत्रा घडली नागोबाची या नाटकाची निवड करण्यात आली असून यंदाचे सर्वोत्कृष्ट नाट्यलेखनाचे पुरस्कार जाहीर करण्यात आल्याचे अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या अध्यक्षा व प्रसिद्ध साहित्यिक प्रा. छाया बोरकर यांनी निवड पत्राद्वारे कळविले असून संस्थागार सामाजिक भवन, गोंदिया येथे दि. ०१/०२/२०२६, रविवारी स. ११.०० वा. होणाऱ्या तिसऱ्या मातोश्री साहित्य संमेलनात नटसम्राट पुरस्कार - २०२६ या नावाने हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

या पुरस्काराचे स्वरूप रोख रक्कम, सन्मानचिन्ह, सन्मान वस्त्र, व सन्मानपत्र असे आहे.

विशेष म्हणजे यंदा चुडाराम बल्हारपुरे यांच्या जत्रा घडली नागोबाची या नाटकास मिळालेला हा दुसरा सन्मान आहे. नुकताच संत्रानगरी नागपूर येथे साहित्य विहार संस्थेतर्फे या नाटकास सर्वोत्कृष्ट नाट्यलेखनाचा द्वितीय पुरस्कार मिळाला आहे.

चुडाराम बल्हारपुरे हे झाडीपट्टीतील प्रसिद्ध नाटककार असून राज्य पुरस्कार प्राप्त साहित्यिक




आहेत. त्यांना महाराष्ट्र शासनाचा सन १९९३ चा उत्कृष्ट वांड्.मय पुरस्कार प्राप्त झालेला आहे.

नुकत्याच सातारा येथे झालेल्या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात त्यांनी विदर्भातील निमंत्रित कवी म्हणून प्रतिनिधित्व केले आहे.

चुडाराम बल्हारपुरे यांच्या या यशाबद्दल प्रा. अरुण बुरे, योगेश गोहणे, रमेश निखारे, प्रा. यादव गहाणे, प्रा. डॉ. श्याम मोहरकर, प्रा. डॉ. जनबंधू मेश्राम, प्रा. डॉ. योगीराज नगराळे, नाट्यश्रीचे दादा चुधरी, दिलीप मेश्राम, राजेंद्र जरुरकर, डॉ. दिपक चौधरी, प्रा. नवनीत देशमुख (साहित्यिक), मधुश्री प्रकाशनचे पराग लोणकर (प्रकाशक), बळवंत भोयर , पांडुरंग सोनवणे इ. साहित्यिक व कलावंतांनी अभिनंदन केले आहे.

# चेनई अ.भा. पशुप्रदर्शन आणि किल्लारी भूकंप - एक अविस्मरणीय अनुभव

ज्योतिर्मय साहित्य

भारत हा कृषीप्रधान देश असला तरी पशुधन हेच भारतीय शेतीचे खरे आत्मा आहे. भारतीय गोवंशाच्या ५० पेक्षा अधिक जाती देशातील विविध हवामान व भौगोलिक परिस्थितीनुसार विकसित झालेल्या आहेत. उपयोगितेनुसार गोवंशाचे मुख्यतः तीन गट पडतात

दुधासाठी, दुध व शेती दोन्ही कामांसाठी, आणि निव्वळ शेतीकामासाठी.

जगाच्या तुलनेत भारतात जनावरांची संख्या लक्षणीय आहे. पशुपालकांमध्ये स्पर्धात्मक वातावरण निर्माण व्हावे आणि शुद्ध देशी गोवंश सर्वांना पाहायला मिळावा, या उद्देशाने अखिल भारतीय स्तरावर विविध राज्यांत पशुप्रदर्शने भरवली जातात.

सन १९९३ मध्ये तामिळनाडूतील चेन्नई येथे २१ ते २७ सप्टेंबर दरम्यान अखिल भारतीय पशुप्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. याच वर्षी लाल कंधारी या गोवंशाला केंद्र सरकारची स्वतंत्र जाती म्हणून मान्यता मिळाली होती. या ऐतिहासिक प्रसंगी या जातीचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मला लाभली.

नांदेडच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लाल कंधारी जातीचे तीन वळू (शेकापूर, दगडसांगवी, कूणकी), एक गाय (उमरज) आणि एक कालवड (बोरी) निवडली होती. माझ्यासोबत पशुधन पर्यवेक्षक एल. जी. रुद्रवार व शिपाई त्रिंबक सूरनर हे सहकारी होते. आवश्यक औषधेही सोबत होती.

त्या काळात ट्रान्सपोर्टचा देशव्यापी संप सुरू असल्याने दोन पोलीस कॉन्स्टेबल नेमले गेले आणि नांदेड







जिल्हाधिकाऱ्यांचे परवानगीपत्र सोबत देण्यात आले.

दि. १७ सप्टेंबर १९९३ रोजी कंधार येथून आमचा निरोप समारंभ झाला. पंचायत समितीचे सभापती स्व. माधवराव पांडागळे, उपसभापती संभाजीराव केंद्रे व अनेक अधिकारी व पशुपालक उपस्थित होते. पुढे सिरूर ताजबंद येथे देवणी जातीच्या पथकाशी आमची भेट झाली. सायंकाळी दोन्ही ट्रक हैदराबादमार्गे चेन्नईकडे रवाना झाले.



डॉ.श्याम वा.कुलकर्णी, महाळूंगे,पुणे, मो. 98238 09656

दि. १९ सप्टेंबर रोजी आम्ही चेन्नई येथे पोहोचलो. देशभरातील विविध गोवंश जातींचे भव्य दर्शन तेथे घडले. प्रत्येक जातीबद्दल माहिती सुशोभित पद्धतीने मांडलेली होती. तमिळनाडूच्या तत्कालीन मुख्यमंत्री मा. जयललिताजी यांचा भव्य कटआउट आणि पशुसंवर्धनाशी निगडित स्टॉल्सनी परिसर सजला होता.

२१ सप्टेंबर रोजी प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. सात दिवस चाललेल्या या सोहळ्याची सांगता २७ सप्टेंबरला झाली.

उमरज येथील श्री. रावसाहेब भूते यांच्या लाल कंधारी गायीला उत्कृष्टतेची ट्रॉफी व प्रमाणपत्र मिळाले, हा आमच्यासाठी अभिमानाचा क्षण होता.

परतीचा प्रवास आणि नियतीचा धक्का -

परतीच्या प्रवासात तिरुपती येथे दर्शन घेतले. हैदराबादमध्ये गणेश विसर्जन मिरवणूक पाहिली. हुमनाबादबिदर मार्गे आम्ही महाराष्ट्रात प्रवेश केला.

३० सप्टेंबर १९९३, पहाटे ३:५६ माळाकोळी (ता. लोहा) जवळ अचानक ट्रकला जबरदस्त धक्का बसला. जनावरे एकमेकांवर कोसळली. आम्ही घाबरून खाली उतरलो. आसपासच्या गावातील लोक भयभीत होऊन घराबाहेर आले होते.

तो साधा धक्का नव्हता, तो होता किल्लारीचा विनाशकारी भूकंप. ६.४ रिश्टर तीव्रतेच्या या भूकंपात हजारो लोक मृत्युमुखी पडले, लाखो घरे उद्ध्वस्त झाली. मराठवाड्याच्या इतिहासातील हा काळाकुट्ट दिवस!

आमच्या सोबत असलेल्या देवणी जातीच्या वळुचे हसेगांववाडी ता. औसाचे मालक श्री श्रीपती लवटे यांची अवस्था काय झाली असेल, या विचाराने मन सुन्न झाले. आजही त्या क्षणाची आठवण झाली की अंगावर काटा येतो.

हा प्रवास केवळ पशुप्रदर्शनाचा नव्हता; तो इतिहास, अभिमान, श्रद्धा आणि निसर्गाच्या अनिश्चित शक्तीचा साक्षीदार ठरलेला जीवनानुभव होता.

***

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

# प्रजासत्ताक दिन म्हणजेच स्वतंत्र भारताची नियमावली

**ज्योतिर्मय साहित्य**

२६ जानेवारी संविधानाचा व नियमांचा आधारस्तंभ आहे.१५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला.परंतु स्वातंत्र्यानंतर संविधान, देशाची नियमावली असने गरजेचे असते.कारण कोणत्याही कार्याकरीता पुढे पाऊल टाकण्यास कायद्याच बंधन असने आवश्यक आहे.२६ जानेवारी १९५० रोजी देशाची राज्यघटना लागु झाली.त्यानिमित्याने भारतातील प्रत्येक नागरिक मोठ्या उत्साहाने प्रजासत्ताक दिन साजरा करीत असतो.कारण प्रजासत्ताक म्हणजे लोकांव्दारे लोकांसाठी प्रस्थापित केलेले शासन. भारतात जात,धर्म, पंथ,वंश, गरीब-श्रीमंत, व्देष या संपूर्ण गोष्टी बाजूला ठेवून गुण्या-गोविंदाने प्रजासत्ताक दिवस वेगवेगळ्या संस्कृतीच्या माध्यमातून मोठ्या उत्साहाने साजरा करतात. २६ जानेवारी १९५० रोजी डॉ. राजेंद्र प्रसाद यांची लॉर्ड माउंट बॅटन(गव्हर्नर जनरल) यांच्या जागी भारताचे पहिले राष्ट्रपती म्हणून निवड झाली.२६ जानेवारीच्या निमित्ताने दरवर्षी राष्ट्रपतींच्या हस्ते दिल्लीतील राजपथावर राष्ट्रध्वज फडकवला जातो.आपण ७६ वा प्रजासत्ताक दिन साजरा करीत आहोत.मुख्यत्वे करून २६ जानेवारीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेली राज्यघटना लागु करण्यात आली. त्यामुळे स्वतंत्र भारतासाठी हा मोठा आणि गौरवाचा दिवस मानल्या जातो.भारताला स्वतंत्र होऊन ७८ वर्षे झाली असली तरी आजही देशात आपल्याला गुन्हेगारी, भ्रष्टाचार, बँक घोटाळे,झुंड बळी, जातीयवाद, हिंसाचार,यांच्याशी आजही आपण लढतोय ही स्वतंत्र भारतासाठी शोकांतिकाच म्हणावी लागेल.अशा गुन्ह्या विरूद्ध सरकारने व राजकीय पुढाऱ्यांनी एकत्र येण्याची नितांत गरज आहे. कारण देश स्वतंत्र करण्यासाठी महात्मा गांधी,भगतसिंग, राजगुरू, सुभाषचंद्र बोस, झाशीची राणी, लाला लजपतराय, लोकमान्य टिळक, चंद्रशेखर आझाद, हजारो क्रांतिकारक, मवाळवादी -जहालवादी, थोर महात्मे इत्यादीसह लाखो स्वतंत्र शुरविरांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. तेव्हाच १५ ऑगस्ट १९४७ हा दिवस उदयास आला. भारताच्या थोर महात्म्यांना भारत स्वतंत्र करण्यासाठी दोन नद्यांचा सहारा घ्यावा लागला व त्या दोन नद्यांचा उगम म्हणजे एक मवाळवादी तर दुसरी जहालवालवादी यांच्या संगमानेच भारतीय स्वातंत्र्यलढा उभा झाला. याकरिता आपल्याला १५ ऑगस्ट उजाडण्यासाठी तब्बल १५० वर्षे वाट पाहावी लागली.१५० वर्षांच्या काळातील स्वतंत्र विरांचे बलीदान व्यर्थ जावु नये व त्यांचा सन्मान व्हावा या उद्देशाने २६ जानेवारी १९५० रोजी राज्यघटना अस्तित्वात आणली.यात मुख्यत्वेकरून डॉ बाबासाहेब आंबेडकर, डॉ राजेंद्र प्रसाद, सरदार वल्लभभाई पटेल,पंडित जवाहरलाल नेहरूसह अनेक थोर महात्म्यांचा सिंहाचा वाटा आहे.परंतु दु:खाची गोष्ट म्हणजे गेल्या ३० वर्षांपासून देशात भ्रष्टाचार, करोडोचे घोटाळे, बलात्कार, गुन्हेगारी,निवडणुकांमध्ये जातीयवाद याला मोठ्या प्रमाणात उत आल्याचे पहायला मिळते.ही शहिद विरांच्याप्रती अत्यंत दु:खद व चिंताजनक बाब आहे. आपल्या पुर्वजांनी व देशाच्या स्वतंत्र संग्राम सेनानींनी आणि बहादुर विरांनी घर-दार, परीवार या संपूर्ण गोष्टी बाजूला सारून व त्याग करून स्वातंत्र्याच्या अग्नी कुंडात उडी घेतली व लाखोंच्या संख्येने बलीदान दिले. परंतु आपली शोकांतिकाच म्हणावी लागेल की आपण भारत स्वतंत्र होऊन ७८ व्या वर्षीत पदार्पण करीत आहोत तरीही

**रमेश कृष्णराव लांजेवार**
नागपूर

भारतातील भ्रष्टाचार थांबलेला नाही.आज भारतातील राजकीय पुढाऱ्यांजवळ, पुंजीपतीं, वॉलीउडक्षेत्र व भ्रष्ट सरकारी अधिकाऱ्यांजवळ वाममार्गाने कमवीलेली करोडोंची चल-अचल संपत्ती आजही आहे. ही संपत्ती एकत्र केली तर भारताला तब्बल



१० वर्षे कोणाही जवळुन कर्ज घ्यावे लागणार नाही व गरीबी आणि महागाई संपुष्टात येवु शकते आणि देश सुजलाम - सुफलाम होण्यास मोठी मदत मिळेल.याकरिता भ्रष्ट अधिकारी व भ्रष्ट राजकीय पुढारी ही देशाला लागलेली कीड आहे ही कीड जळामुळासकट नष्ट व्हायला हवी व यावर आळा बसायला हवा.आज मुठभर राजकीय पुढाऱ्यांनी करोडो रुपयांची चल-अचल संपत्ती डांबुन ठेवल्याने व चलनात नसल्याने देशातील गरीब वर्ग गरीबीच्या खाईत जात आहे तर श्रीमंत वर्ग दिवसेंदिवस श्रीमंत होत आहे व देशाच्या विकासामध्ये मोठा अडथळा निर्माण होत आहे. यामुळेच देशात महागाई व बेरोजगारी मोठ्या प्रमाणात दिसून येते.भारताचे प्रजासत्ताक दिनाचे ७६ व्या वर्षाचे औचित्य साधून देशातील संपूर्ण भ्रष्टाचाऱ्यावर कठोर कारवाई करून त्यांनी वाममार्गाने कमवीलेला पैसा सरकारने आपल्या तिजोरीत जमा करावा. यामुळे देशाचा विकास, बेरोजगारीची समस्या, महागाई यावर आळा घालण्यासाठी मोठी मदत होईल व देशाचा विकास भरभराटीला येईल.याचे स्वागत आपले पुर्वज,शहीद व स्वतंत्र सेनानी अवश्य करेल व त्यांच्या स्वतंत्र लढ्याला दिलासा अवश्य मिळेल हीच प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने शहिदांना खरी आदरांजली ठरेल.देशात वाढते हवामानातील बदल, प्रदूषण व ग्लोबल वार्मिंगचा धोका पहाता. प्रजासत्तक दिनाचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायला हवी. याकरीता शाळा, कॉलेज, संपूर्ण सरकारी क्षेत्र, राजकीय पुढारी, सामाजिक संघटना यांनी पुढाकार घ्यायला हवा.यामुळे मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण होईल व प्रदूषणावर मात करण्यासाठी मोठी मदत मिळेल. आजच्या दिवशी वृक्षलागवड झाली तर ती अनंतकाळापर्यंत सर्वांच्या हृदयात राहील व लाखो शुरविरांचे दर्शन प्रत्येक झाडाच्या पानात, फुलात, फळात व जळामुळात आपल्याला होईल. यामुळे भारतीय शहिदांची व शुरविरांची गाथा अबाध्य आहे.कारण त्यांच्या आशीर्वादानेच आपण आज मोकळा श्वास घेत आहोत.जय हिंद!

***

# ‘संस्कार दशसूत्रीचे रंग राष्ट्रभक्तीचे’ ; प्रजासत्ताक दिनी विशेष आयोजन

## दीड लाख विद्यार्थी करणार देशभक्ती गितांच्या तालावर सामुहिक कवायत

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर -सोमवारी (दि.२६) रोजी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधुन विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती, शिस्त, राष्ट्रीय एकात्मता आणि संविधानिक मूल्यांची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने देशभक्तीपर गीतांवर सामूहिक कवायत संचलन हा अभिनव व प्रेरणादायी उपक्रम राज्यभर राबविण्यात येत आहे. जिल्ह्यात या उपक्रमांतर्गत ३५ ठिकाणी हा उपक्रम एकाच वेळी राबविण्यात येत असून १ लाख ५० हजार विद्यार्थी यात सहभागी होतील,असे नियोजन आह, अशी माहिती शिक्षणाधिकारी (माध्य.) श्रीमती आश्विनी लाठकर यांनी दिली.

राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम राबविण्यात येणार असून राज्यातील १ लाख शाळांमध्ये ७ लाख शिक्षक व २ कोटी विद्यार्थ्यांचा सहभाग असेल. ‘संस्कार दशसुत्रीचे, रंग देशभक्तीचे’ असे या कार्यक्रमाचे नाव आहे. जिल्ह्यात १ लाख ५० हजार विद्यार्थी या उपक्रमात सहभागी होतील, त्यानुसार या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी साहेब यांच्या संकल्पनेतून सध्या सुरू असलेल्या दशसूत्री उपक्रमांतर्गत ‘राष्ट्रभक्ती जागृत करणे’ या महत्त्वपूर्ण सूत्राचा एक भाग आहे. विद्यार्थ्यांच्या सहभागातून राष्ट्रप्रेम केवळ शब्दांत नव्हे तर कृतीतून व्यक्त व्हावे, हा या उपक्रमामागील मुख्य हेतू आहे. या उपक्रमांतर्गत तालुका स्तरावर मुख्यालयासह विविध ठिकाणी शाळांमधील विद्यार्थी एकत्र येऊन एकाच देशभक्तीपर गीताच्या तालावर शिस्तबद्ध कवायत सादर करणार आहेत. शिस्त, समन्वय, संघभावना आणि राष्ट्रध्वजाप्रती आदर यांचे प्रभावी दर्शन या सामूहिक कवायत संचलनातून घडणार आहे.

या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन शिक्षणाधिकारी (माध्य.) श्रीमती अश्विनी लाठकर यांच्या मार्गदर्शनात शिक्षण विभाग, महसूल प्रशासन, आरोग्य यंत्रणा, पोलीस विभाग व आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा यांच्या समन्वयातून होत आहे. विद्यार्थ्यांची सुरक्षितता, आरोग्य आणि शिस्त यांना या कार्यक्रमात सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व तालुके व जिल्हास्तरावर ३५ ठिकाणी ही कवायत संचलन करण्यात येणार असून यामध्ये जवळपास दीड लाख विद्यार्थी सहभागी होतील अशा पद्धतीचे नियोजन शिक्षण विभाग माध्यमिक यांनी केली आहे. शहरात राजे संभाजी सैनिकी स्कूल कांचनवाडी, पोलीस अधीक्षक ग्रामीण कार्यालय टीव्ही सेंटर , शारीरिक शिक्षण महाविद्यालय नागसेन वन छावणी छत्रपती संभाजीनगर येथे कवायत संचलनासाठी विद्यार्थी एकत्र येणार आहेत.

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, एकाच वेळी अनेक ठिकाणी मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांचा सहभाग असलेला हा सामूहिक कवायत संचलन उपक्रमाची दखल राज्यस्तरावरून घेण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध सहभागातून राष्ट्रभक्तीचा संदेश राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचविण्याचा हा ऐतिहासिक प्रयत्न ठरणार आहे.

राज्यातील विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती, शिस्त, एकात्मता आणि राष्ट्रीय कर्तव्यभावना अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने ‘राष्ट्र प्रथम’ या प्रभावी टॅगलाईनखाली राज्यभर एक ऐतिहासिक आणि अभूतपूर्व उपक्रम राबविण्यात येणार आहे.

या उपक्रमाअंतर्गत राज्यातील सर्व शाळांमधील विद्यार्थी एकाच वेळी १४ मिनिटांच्या देशभक्तीपर गीतांवर सामूहिक कवायत संचलन सादर करणार आहेत.


हा उपक्रम शालेय शिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य यांच्या संकल्पनेतून साकारत असून विद्यार्थ्यांमध्ये देश सर्वप्रथम ही भावना कृतीतून रुजविणे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. शिस्तबद्ध हालचाली, सामूहिक सहभाग आणि राष्ट्रध्वजाप्रती आदर यांमधून विद्यार्थ्यांच्या मनात राष्ट्रप्रेम अधिक ठळकपणे अधोरेखित होणार आहे. या राज्यव्यापी उपक्रमात जवळपास अडीच कोटी विद्यार्थी सहभागी होणार असून ही संख्या स्वतःमध्येच एक विक्रम ठरणार आहे.

विशेष बाब म्हणजे, या सामूहिक कवायत संचलनाची नोंद मध्ये करण्यात येणार आहे. इतक्या मोठ्या प्रमाणावर, एकाच वेळी, एकसंध पद्धतीने होणारा हा उपक्रम देशाच्या शैक्षणिक इतिहासातील एक सुवर्णक्षण ठरणार आहे. या उपक्रमात केवळ विद्यार्थीच नव्हे तर राज्यभरातील सर्व शिक्षक, शाळा प्रमुख, शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचारी देखील सक्रिय सहभाग नोंदवणार आहेत. शिक्षक आणि अधिकारी स्वतः सहभागी होऊन विद्यार्थ्यांना प्रेरणा देणार असल्याने हा उपक्रम अधिक अर्थपूर्ण आणि प्रेरणादायी ठरणार आहे,असे शालेय शिक्षण विभागाने कळविले आहे.





































# वर्षपूर्ती - ज्योतिर्मयची देदीप्यमान वाटचाल

**ज्योतिर्मय साहित्य**

दैनिक ज्योतिर्मयच्या सर्व लेखक, लेखिका सर्व कवी, कवयित्री, सर्व हितचिंतक यांना कळविण्यास अत्यंत आनंद होत आहे की, आपल्या सर्वांच्या लाडक्या दैनिकाने २६ जानेवारी २०२६ रोजी एक पुर्ण केले आहे.

त्यामुळे, प्रथम वर्धापनदिनानिमित्त आपल्या आवडत्या व लाडक्या दैनिक ज्योतिर्मयला माझ्याकडून खूप खूप हार्दिक शुभेच्छा! आपले सर्वांचे दैनिक ''ज्योतिर्मय हे रौप्यमहोत्सवी वर्षही धूमधडाक्यात साजरा करतो! अशी मी माझ्याकडून तसेच, आपल्या सर्वांच्या वतीने ज्योतिर्मयला खूप हार्दिक शुभेच्छा देतो.

याबद्दल दै. ज्योतिर्मयचे व मा.संपादक श्री. संजयजी व्यापारी सरांचे व ज्योतिर्मयच्या आपणा सर्व लेखक/लेखिका, सर्व कवी/कवियत्री तसेच, सर्व हितचिंतकांचे अभिनंदन माझ्याकडून व आपणाकडून हार्दिक अभिनंदन करतो. सर्वश्रेष्ठ संत श्रीज्ञानेश्वर माऊलींनी त्यांच्या अभंगात म्हटलेलेंच आहे. ''इवलेसे रोप लावियले द्वारी। तयाचा वेलू गेला गगनावरी। मोगरा फुलला, मोगरा फ ुलला। त्याप्रमाणेच हे ज्योतिर्मय दैनिकाचे लावलेले रोप आपण सर्वांनी मिळून फुलवायला हवे. ते आपल्या सर्व कवी, कवियत्री, लेखक व लेखिका यांच्या दर्जेदार लेखनाने आणि कवितेने! त्यामुळे, हा ज्योतिर्मयचा साहित्यिक मोग-याचा वेलू गगनावरी जाण्यासाठी आपल्या सर्वजणांच्या सहकार्याची, प्रेमाची व उत्कृष्ट साहित्याची आवश्यकता आहे. त्यामुळे, या ज्योतिर्मयच्या कुटुंबातील सर्व सदस्यांनी एकनिष्ठ कर्तव्याने सामाजिक, आर्थिक, साहित्यिक ज्ञानाने सहकार्य केल्यास हा ज्योतिर्मयचा वेलू निश्चितपणे गगनावरी जाईल यात शंका नाही.


मधुकर निलेगावकर, पुणे

याबाबतीत एका हिंदी चित्रपटाचे उदाहरण अगदी योग्य होईल. '' नया दौर ''या हिंदी चित्रपटात दिलीपकुमार व मीनाकुमारी यांचं एक द्वंदगईत आहे. ''साथी हाथ बघाना साथी रे''। एक अकेला थक जाएगा,मिलकर बोझ उठाना। साथी हाथ बढाना साथी रे ''

याप्रमाणे सर्वांनी एकत्र येऊन सहकार्य केल्यास हा ज्योतिर्मय दैनिकाचा दिवा अधिक प्रकाशमान होऊन सर्वांना ज्ञानाचा, आनंदाचा, समाधानाचा प्रकाश भरभरुन देईल यात शंकाच नाही. पुनःश्च एकदा दैनिक ज्योतिर्मयच्या प्रथम वर्धापनदिनानिमित्त दैनिक ज्योतिर्मयला खूप खूप हार्दिक शुभेच्छा! आणि सर्वांनाही!

***

# ज्योतिर्मय - साहित्याची प्रखर ज्योत

**ज्योतिर्मय साहित्य**

नमस्कार

तीळातील स्नेह व गुळातील गोडवा सर्वांच्या मनामध्ये कायम राहो ह्या शुभेच्छा तीळगुळ घ्या गोड गोड बोला, सांगायला आनंद होत आहे श्री संजय काशीनाथ व्यापारी एका अभ्यासु, निर्भिड पत्रकाराने गेल्या वर्षी रथसप्तमीच्या दिवशी ''ज्योतिर्मय'' या दैनिकाची स्थापन केली, वर्षभरात १५० पेक्षा जास्त लेखक, कवी, नवसाहित्यिकांना, पत्रकारांना आपले विचार व्यक्त करायला एक हक्काचे व्यासपीठ मिळवून दिले. ज्ञानाचे वाण लुटण्याची संधी उपलब्ध करून दिली. त्यामध्ये अध्यात्म, विज्ञान, कला, संस्कृती, शिक्षण, बालकवी अशा विविधांगी विषयावर लेखन वाचकांना वाचायला मिळाले. संपन्न विचारसरणीच्या लोकांना एक बहूआयामी व्यासपीठ मिळवून दिले. अवघ्या एक वर्षाच्या कालावधीत लहानथोर सर्वांना हवेहवेसे वाटणारे ''ज्योतिर्मय'' आज प्रथम स्थानात आहे. याचा सार्थ अभिमान आहे. संपादक व्यापारी सरांच्या अथक प्रयत्नामुळे हे यश मिळाले आहे. आडनाव व्यापारी असले तरी कुठलाही ''व्यापार'' या पत्रकारीतेत नाही. अशी निस्पृहता जपणाऱ्या संपादकांच्या योगदानाने हे शिवधनुष्य उचलले गेले आहे, असंख्य वाचक, लेखक, पत्रकारांना ज्योतिर्मयच्या वर्षपूर्तीच्या निमित्ताने शुभेच्छा महाराष्ट्र व देशात यांची किर्ती व्हावी अशा अनंत सदिच्छा.


सौ उज्वला धर्माधिकारी, पुणे

# तिळगुळ, उखाणे आणि गीतांनी वाढवला मकर संक्रांतीच्या कार्यक्रमाचा गोडवा

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे - सौभाग्याचे प्रतिक असलेल्या हळदी-कुंकवासह वाणांची देवाण घेवाण, मजेशीर उखाणे, पुरुषांसाठी तिळगुळाचे वाटप आणि जोडीला अवीट गोडी असलेल्या गीतांच्या श्रवणानंदाने पिंपळे सौदागर येथील ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनच्या कार्यक्रमाचा गोडवा उत्तरोत्तर वाढत गेला. मकर संक्रांत आणि वसंत पंचमी निमित्ताने शुक्रवारी सायंकाळी स्व. बाळासाहेब कुंजीर क्रिडांगणावर झालेल्या या कार्यक्रमास प्रभागातील नवनिर्वाचित नगरसेविका डॉ. कुंदाताई भिसे, अनिता काटे आणि सपना काटे यांची प्रमुख उपस्थिती होती. या तिघींनी मकर संक्रांती निमित्ताने उपस्थित महिलांसमोर मनोगत व्यक्त करुन शुभेच्छा दिल्या तसेच प्रभागातील विकासकामांसाठी कटीबद्ध असल्याचे सांगितले.




कार्यक्रमाचा प्रारंभ सरस्वती पुजनाने करण्यात आला. हळदी कुंकू आणि तिळगुळ वाटपासोबतच या कार्यक्रमात सुरेखा पाटील, नीता गुप्ता, शोभा पोरवाल, मीनल जोशी, रेखा सहाय, रेखा देवपूरकर यांनी अवीट गोडीची मराठी - हिंदी गाणी सादर करुन उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शकुंतला शिंदे यांनी केले. मकर संक्रांत सणाची माहिती, उत्तरायणातील आहार-विहार तसेच वसंत पंचमी याबाबतची माहिती शोभा राजगुरे, निर्मला कासार आणि भामिनी महाले यांनी दिली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संघटनेचे अध्यक्ष डॉ. सुभाष पवार तसेच सखाराम ढाकणे, विवेकानंद लिगाडे, दिलिप चौगुले, अनिलकुमार शाह, जयपाल सिदनाळे, अशोक येळंमकर, अनिल कुलकर्णी, रमेश चांडगे, अशोक कलाल, विमल मोंढेकर या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. भामिनी महाले यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# पद्म पुरस्कार २०२६ जाहीर ; महाराष्ट्रातील १५ मान्यवरांचा गौरव

**ज्योतिर्मय साहित्य**

नवी दिल्ली - देशातील सर्वोच्च नागरी सन्मानांपैकी महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या पद्म पुरस्कारांची घोषणा आज करण्यात आली. कला, क्रीडा, विज्ञान, व्यापार आणि समाजसेवा आदी विविध क्षेत्रांतील योगदानसाठी १३१ मान्यवरांना हे पुरस्कार यंदा जाहीर झाले असून, यामध्ये महाराष्ट्रातील १५ मान्यवरांचा यामध्ये समावेश आहे. महाराष्ट्राला एक 'पद्म विभूषण' तीन पद्म भूषण आणि ११ पद्मश्री पुरस्कार मिळाले आहेत.

केंद्रीय गृहमंत्रालयाकडून दरवर्षी प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला हे मानाचे पुरस्कार घोषित केले जातात. २०२६ च्या पुरस्कांरासाठी कला, क्रीडा, विज्ञान, व्यापार आणि समाजसेवा आदी विविध क्षेत्रात योगदान देणाऱ्यांचा समावेश आहे. देशभरातून एकूण १३१ मान्यवरांची या पुरस्कारांसाठी निवड करण्यात आली असून त्यात ५ पद्म विभूषण, १३ पद्म भूषण आणि ११३ पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे. यंदा १९ महिला, ६ परदेशी अथवा अनिवासी भारतीय तसेच १६ व्यक्तींना मरणोत्तर हा सन्मान जाहीर झाला आहे.

हिंदी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र सिंह देओल यांना मरणोत्तर 'पद्म विभूषण' पुरस्कार जाहीर झाला आहे. पद्म भूषण श्रेणीमध्ये महाराष्ट्रातील तीन मान्यवरांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये प्रसिद्ध पार्श्वगायिका अलका याज्ञिक (कला), जाहिरात क्षेत्रातील दिग्गज पीयूष पांडे (मरणोत्तर कला) आणि बँकिंग क्षेत्रातील उदय कोटक (व्यापार व उद्योग) यांचा समावेश आहे.

पद्मश्री पुरस्कारांसाठी महाराष्ट्रातील ११ मान्यवरांच्या नावांची घोषणा करण्यात आली आहे. यामध्ये क्रीडा क्षेत्रातून क्रिकेटपटू रोहित शर्मा, वैद्यकीय क्षेत्रातील योगदानासाठी श्रीमती आर्मिडा फर्नांडिस, समाजसेवेसाठी जनार्दन बापूराव बोथे आणि कृषी क्षेत्रासाठी श्रीरंग देवाबा लाड यांचा समावेश आहे. कला क्षेत्रातून भिकल्या लाडक्या धिंडा, माधवन रंगनाथन, रघुवीर तुकाराम खेडकर आणि सतीश शाह (मरणोत्तर) यांना हा सन्मान जाहीर झाला आहे. तसेच व्यापार व उद्योग क्षेत्रातून अशोक खाडे व सत्यनारायण नुवाल आणि विज्ञान व अभियांत्रिकी क्षेत्रातून जुझेर वासी यांना हा सन्मान जाहीर झाला आहे.

येत्या मार्च-एप्रिल महिन्यात राष्ट्रपती भवनात आयोजित विशेष सोहळ्यात राष्ट्रपतींच्या हस्ते हे सर्व पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.











